# संत अंतोनीचा नोव्हेना



## संत अंतोनीकडे परिणामकारक प्रार्थना

हे पवित्र संत अंतोनी, तू सर्व संतामध्ये सज्जन व दयाळू आहेस. तुझे देवावर असलेले निस्सीम प्रेम, तुझे सद्गुण, तुझा प्रेमळपणा आणि इतरांना दाखवलेला बंधुभाव या देणग्यांनी तुला ईश्वराने या भूतलावर दैवी चमत्कार करण्याची शक्ति दिली आहे. ज्या ज्या व्यक्ती संकटात आहेत, अशा व्यक्तींसाठी परमेश्वराकडून विनवणी करुन तू दैवी चमत्कार करतोस. चिंतातूर अवस्थेत केलेली प्रार्थना कधीच व्यर्थ गेली नाही. तू आजा-यांना बरे केलेस. जे हरवले होते त्यांचा शोध  घेतलास. जे दुःखी होते त्यांना दिलासा व धीर दिलास. तुझ्या पापी लोकांना दयाळू वृत्तीने जीवनाची नवीन दिशा दिलीस, जे तळमळीने तुझ्याकडे धावले त्यांना दिलासा देणे तुला शक्य झाले कारण तुझ्यामध्ये भेदभाव करण्याची वृत्ती नव्हती.

तुझ्या पवित्र जीवनाबद्दल आणि चांगल्या निरागस विचाराने आम्ही तुझ्यापुढे नतमस्तक होतो. तुझी भक्ती करतो. आमच्या विनंत्या ऐक. आम्ही श्रद्धेने चमत्काराची अपेक्षा करतो. दैवी चमत्कार करणाया प्रेमळ व सौम्य वृत्तीच्या संत अंतोनी तुझे हृदय सतत मनुष्याला दया दाखवणारे होते. तुझ्या एका शब्दाने आमच्यासाठी बाळ येशूकडे मध्यस्थी कर. अशी प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताकडे करतो........... आमेन.

आमच्या स्वर्गीय बापा.........
नमो मरिया.........
पिता, पुत्र व पवित्र आत्म्या.........





## नववा दिवस

"तुमच्या शत्रूंवर प्रीती करा."

### आपण प्रार्थना करु या.

**प्रमुख** : शत्रूंवर प्रीती करण्यासाठी आपल्याला योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून आपण संत अंतोनीच्या मध्यस्थीद्वारे प्रभुकडे प्रार्थना करुया.

**सर्व** : प्रभो आम्हावर दया कर आणि आमची प्रार्थना ऐक.

**प्रमुख** : शत्रूंवर प्रीती करण्याची आज्ञा आपल्याला अधिक चांगल्याप्रकारे समजावी म्हणून आपण संत अंतोनीच्या मध्यस्थीद्वारे प्रभुकडे प्रार्थना करुया.

**सर्व** : प्रभो आम्हावर दया कर आणि आमची प्रार्थना ऐक.

**प्रमुख** : ह्या आज्ञेचे सदाकाळ पालन करण्यासाठी आम्हाला शहाणपण मिळावे म्हणून आपण संत अंतोनीच्या मध्यस्थीद्वारे प्रभुकडे प्रार्थना करुया.

**सर्व** : प्रभो आम्हावर दया कर आणि आमची प्रार्थना ऐक.

**प्रमुख** : शत्रूंना क्षमा करण्याची व त्यांच्यावर प्रीती करण्याची टिकाऊ स्वरुपाची कृपा आपल्याला मिळावी म्हणून आपण संत अंतोनीच्या मध्यस्थीद्वारे प्रभुकडे प्रार्थना करुया.

**सर्व** : प्रभो आम्हावर दया कर आणि आमची प्रार्थना ऐक.

### आपण प्रार्थना करु या.

हे परमेश्वरा, प्रभू येशूद्वारे तू आमच्यापुढे शत्रूंवर प्रीती करण्याचे उदाहरण ठेवले आहेस. हा अवघड धडा प्रत्यक्ष गिरविण्यासाठी आम्हाला तू साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

**सर्व** : आमेन.